# दोन नेत्यांची कथा

*इंदिरा गांधी व नरेंद्र मोदी यांच्यात खरोखरच तुलना करता येईल काय?*

काही वेळा काही व्यक्तिमत्वं निकरानं ऐतिहासिक बदल घडवून आणतात, परंतु त्यांची ही कृती इतिहासाचं फलित म्हणूनच घडलेली असते. नऊ नोव्हेंबर २०१७ रोजी इंदिरा गांधी यांची जन्मशताब्दी होती, त्या निमित्तानं गांधी व नरेंद्र मोदी यांच्यातील साम्यं शोधणारी चर्चा सुरू झाली. परंतु इतिहासाविषयीचा वरील मुद्दा या चर्चेदरम्यान ध्यानात घेतला गेलेला दिसत नाही. या चर्चेत सहभागी झालेल्या काही भाष्यकारांनी गांधी व मोदी यांच्यात घाईगडबडीनं साम्यं शोधली. तर, असे साम्य शोधण्याचे प्रयत्न म्हणजे आपल्याला हवं तेच शोधून सोईस्कर सत्य उभारण्याचे प्रकार आहे, अशी टीका इतर काहींनी केली. इंदिरा गांधी व नरेंद्र मोदी ही अतिशय भिन्न व्यक्तिमत्वं आहेत; त्यांच्या धोरणात्मक प्राधान्यक्रमांमधील तफावतही फार मोठी राहिली आहे; त्याचप्रमाणे त्यांच्या भोवतीच्या ऐतिहासिक परिस्थितींमध्येही बराच फरक होता. परंतु यातील काही रोचक रचनात्मक समानता तपासण्याबाबत आपण काणाडोळा करणं मात्र योग्य नाही. फलदायी ऐतिहासिक तुलना करताना समरूप आणि विषमरूप या दोन्हींची दखल घेतली जाते; केवळ साम्य किंवा केवळ भेद शोधणं असं या तुलनेचं स्वरूप असू नये. या अर्थानं तपासलं तर गांधी व मोदी यांचं मूल्यमापन अनेक गोष्टी उघड करणारं ठरतं.

त्यांच्या राजकीय उदयाच्या परिस्थितीमध्येच मुख्य विषमरूपता दिसते. आपल्या वडिलांचा वारसा एवढीच इंदिरा गांधीकडची राजकीय संपत्ती होती. कोणत्याही प्रदेशात अथवा स्वतःच्या पक्षातही त्यांचा स्वतःचा राजकीय पाया नव्हता. आपल्याला इंदिरा यांचा वापर सोयीनुसार करता येईल, या हेतूनं काँग्रेसमधील जुन्या धेंडांनी (सिंडिकेट) त्यांची निवड केली होती. कोणत्याही 'इंदिरा लाटे'मुळं त्यांच्याकडं सरकारची सूत्रं आली नव्हती; किंबहुना अशी लाट त्यांना निर्माण करावी लागली. त्यामुळं पंतप्रधानपदाचं कामकाज स्वीकारल्यानंतर सुरुवातीचा काळ त्यांना तारेवरची कसरत करावी लागली. या उलट मोदींना प्रचंड लोकप्रियतेच्या आधारावर पंतप्रधानपद मिळालं, गुजरातमध्ये त्यांचा आधीपासूनचा जनाधार होता, आणि पक्षातील जुन्या ज्येष्ठांना त्यांनी आधीच मवाळ करून ठेवलं होतं. इंदिरा गांधींना काही पावलं उचलण्यापूर्वी कुशल क्लृप्त्या कराव्या लागल्या, तर मोदींनी सत्तेत आल्यानंतर तत्काळ अशी पावलं उचलली. परंतु, दोघांनीही थोड्याच काळात धोरणांना दृश्यात्मकता दिली आणि त्यातून पंतप्रधान हे सार्वभौमतेचं प्रतीक आहे असा प्रचार केला.

दुर्बल नेते संकटांना तोंड देतात, तर बलवान नेते संकटं निर्माण करतात, अशी एक म्हण राजकारणात प्रचलित आहे. इंदिरा गांधी आणि नरेंद्र मोदी हे निश्चितपणे संकटं निर्माण करणाऱ्या बलवान नेतृत्वामध्ये गणले जातील. गांधींना हे रूप धारण करण्यासाठी काही वेळ घ्यावा लागला. त्यांचे सुरुवातीचे निर्णय (उदाहरणार्थ- रूपयाचं अवमूल्यन) त्यांच्या स्वतःच्या नियंत्रणापेक्षाही परिस्थितीनं नियंत्रित केलेले होते. परंतु थोड्याच काळात संकटनिर्मितीची क्षमता त्यांनी प्राप्त

केली. राष्ट्रपतीपदासाठीची निवडणूक, बँकांचं राष्ट्रीयीकरण, किंवा संस्थानी विशेषाधिकारांचं उच्चाटन, अशा अनेक वेळी त्यांच्या नेतृत्वाची ही बाजू उघड झाली. आणीबाणीची घोषणा करणं हा याचा सर्वोच्च बिंदू होता. काँग्रेस पक्षात पाडलेली फूट, संसदीय व राज्य विधानसभा निवडणुकांमधील ताल बिघडवणं, सर्वोच्च न्यायालयाच्या निकालांच्या विरोधात वागणं, किंवा मूलभूत अधिकारांची पायमल्ली करणं– अशा विविध टोकाच्या कृती म्हणजे संकट निवारण्यासाठीच्या उपाययोजना असल्याची ग्वाही त्या देत राहिल्या. वास्तविक त्यांनी स्वतःच एकहाती उभी केलेली ही संकटं होती. दुसऱ्या बाजूला, मोदींना मनाजोगती पावलं उचलण्यासाठी खुलं मैदान मिळालं. कित्येक दशकं संयमानं संगोपन झालेल्या स्वायत्त संस्थांना क्षणात संकटात ढकलण्यात आलं. सरकारी विद्यापिठांपासून ते भारतीय रिझर्व बँकेपर्यंतच्या सर्व संस्थांना हा अविचारी हस्तक्षेप सहन करावा लागला.

धोरणात्मक बाबींच्या संदर्भात इंदिरा गांधी व नरेंद्र मोदी हे दोन्ही पंतप्रधान एकमेकांपासून प्रचंड मोठं अंतर राखून आहेत. गांधींची धोरणं स्पष्टपणे समाजवादी उक्ती राखून होती. त्यांची धोरणं (आणीबाणी वगळता) कधीही जाणीवपूर्वक गरीबविरोधी नव्हती. यातील काही धोरणं तर केवळ अभिजनांच्या विशेषाधिकारांवर गदा आणणारी होती. उलट, मोदींची धोरणं निःसंदिग्धपणे (गैरसमजावर आधारीत) लोकानुनयासाठीची आहेत. निश्चलनीकरण आणि 'वस्तू व सेवा कर' या दोन्ही निर्णयांचा सर्वाधिक विपरित फटका गरीबांना बसला आहे. राष्ट्रासाठी 'त्याग' करण्याचं आवाहन त्यांना करण्यात आलं, तर श्रीमंतांनी मात्र अधिक सहजपणे या अडचणी पार केल्या. मोदींचं हे धक्कातंत्र युरोपीय फॅसिझमपेक्षाही हिंदू राजेशाहीच्या संकल्पनेमधील निरंकुशता दाखवणारं आहे, आणि हिंदुत्ववादाच्या विचारधारेला धरूनच त्यांचं हे वर्तन आहे, असं काही भाष्यकारांनी स्पष्ट केलं आहे.

या दोन पंतप्रधानांमधील धोरणात्मक भेद हे त्यांच्याकडील गुणवत्तेच्या उपलब्धतेमधील तफावतीतून आल्याचं काही वेळा म्हटलं जातं. गांधींना त्यांच्या मंत्रिमंडळावर फारसा विश्वास नव्हता, परंतु धोरण सल्लागार म्हणून काही निवडक तज्ज्ञांचा कंपू त्यांनी सोबतीला ठेवला होता. गुणवत्ता आणि वैयक्तिक सचोटी असलेले पुरुष (स्त्रिया नाहीत) या कंपूत होते. या उलट, मोदींकडं अशा गुणवत्तेची वानवा आहे. अमित शहा त्यांना निवडणुका जिंकून देऊ शकतात, परंतु पी. एन. हक्सर यांनी इंदिरा गांधी यांच्यासाठी जे केलं किंवा व्ही. व्ही. कृष्णमेनन व पी. सी. महालनोबिस यांनी जवाहरलाल नेहरूंसाठी जे केलं, तशी कर्तबगारी शहा मोदींसाठी दाखवू शकत नाहीत.

बौद्धिक कामगिरीबाबत संघ परिवाराला वाटत असलेला तिरस्कार मोदी सरकारमधील गुणवत्तेच्या उणिवेला कारणीभूत ठरला आहे, हे निःसंशयपणे म्हणता येतं. विवेकवृत्तीलाच परकीय, अविश्वासार्ह व त्यामुळं अनावश्यक मानणाऱ्या पर्यावरणाकडं सक्षम व्यावसायिकही आकर्षित होण्याची आशा करता येणार नाही; मग बुद्धिमंत आणि विचारवंत यांची तर बातच दूर. इंदिरा गांधींनी राजकारणाचा विचारसरणीय पाया काढून टाकला, असा आरोप केला जात असला तरी ढोबळपणे घट्ट वीण असलेल्या काँग्रेस पक्षाद्वारे त्यांनी स्रोतसंपन्न घटक स्वतःसोबत घेण्याचं कामही केलं. या उलट, भारतीय जनता पक्षाचं स्वरूप पदाधिकाऱ्यांच्या रचनेला प्राधान्य देणारं आहे, त्यामुळं बौद्धिक स्रोत असलेल्या लोकांचा प्रवाह प्रतिबंधित होतो. शिवाय, भाजपमध्ये राजकीय प्रगती साधण्यासाठी इच्छुकांना अजूनही राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे आशीर्वाद गरजेचे असतात. यासाठी धर्मांधता आणि अविवेक यांमधील सामाजिकीकरण अंगवळणी पडलेलं असावं लागतं. गुणवत्ता बहरण्यासाठी ही काही फारशी सुपीक भूमी म्हणता येणार नाही.

अर्थात, या दोन नेत्यांच्या व्यक्तिमत्वांमध्ये व

राजकीय प्रशिक्षणामध्ये मुख्य विषमरूपता दिसते. व्यक्तीस्तोम माजवणं आणि योग्य प्रक्रियांचा अनादर करणं यांबाबतीत मोदींनी 'इंदिरांचा वारसा' चालवला आहे, असं म्हणता येतं. परंतु गांधींच्या अहंकाराला सुसंस्कृतता आणि आधुनिक उदारमतवादी परंपरेतील शिक्षण यांनी निवळवलं होतं. सर्व प्रक्रियांचा अवमान करण्यालाही त्यांच्या राजकीय प्रशिक्षणामुळं प्रतिबंध होत होता. अगदी आणीबाणीची घोषणा करतानाही त्यांनी घटनात्मक तरतुदींचा वापर केला. मोदींचं व्यक्तिमत्व आणि त्यांची राजकीय परंपरा यांचा विचार करता अटीतटीच्या प्रसंगात ते घटनात्मक तरतुदींचं पालन करतील अशी शक्यता कमी आहे. त्यामुळं भारताचं या वेळचं नेतृत्व अधिक चिंताजनक ठरतं.

●

## न्यायाची मुस्कटदाबी

*न्यायालयीन कामकाजापासून प्रसारमाध्यमांना दूर ठेवल्याने न्यायव्यवस्थेवरील विश्वास घटेल.*

खुला न्याय हा भारतातील न्यायव्यवस्थेचा आधारस्तंभ आहे. न्यायालयांमधील सुनावण्यांवेळी उपस्थित राहाण्याची मुभा सर्व जनतेला आहे आणि प्रसारमाध्यमांना या सुनावण्यांचं वार्तांकन करण्याची मुभा आहे. ही मुभा अर्थातच 'तत्त्वतः' असते. व्यावहारिक पातळीवर मात्र न्यायालयीन सभागृहांमधील अपुरी जागा आणि सुनावणीमधील संभाव्य अडथळा रोखण्याची गरज यांमुळं सुनावण्यांच्या वेळी प्रवेशावर निर्बंध राहू शकतो. त्यामुळं न्यायालयातील कामकाजाचा निःपक्षपाती आणि अचूक सारांश आपल्यापर्यंत पोचावा यासाठी सर्वसामान्य जनता पत्रकारांवर विसंबून असते. एखाद्या प्रकरणामध्ये जितके अधिकाधिक हितसंबंध गुंतलेले असतील तितका त्यामध्ये जनतेला अधिक रस असतो, परिणामी या प्रकरणाचं कामकाज निर्दोष व्हावं यासाठी न्यायालयावरही अधिक दबाव असतो. निकाल काहीही लागला तरी न्यायव्यवस्थेवरचा जनतेचा विश्वास प्रक्रियेवर अवलंबून असतो. ही प्रक्रिया निःपक्षपाती आणि कायद्याला धरून झाल्याचा विश्वास जनतेला वाटणं आवश्यक असतं. न्यायिक प्रक्रिया प्रत्यक्ष पाहून त्यामध्ये सचोटी राखली आहे की नाही, हे पाहाण्याची मुभा जनतेला असते. सरकारच्या इतर कोणत्याही अंगापेक्षा भिन्न असं हे न्यायव्यवस्थेचं वैशिष्ट्य आहे.

त्यामुळं न्यायालयांनी स्वतःच हे तत्त्व सातत्यानं बाजूला सारणं निराशाजनक ठरतं. शिवाय अशा कृतींचा परिणाम काय होईल याचाही फारसा विचार न्यायालयीन व्यवस्थेकडून केला गेलेला दिसत नाही. सोहराबुद्दीन शेख व इतरांच्या हत्येप्रकरणी अनेक पोलीस अधिकाऱ्यांवर सुरू असलेला फौजदारी खटला आणि द्वेषमूलक वक्तव्य केल्याप्रकरणी उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्यावर कारवाई करण्याबाबत अलाहाबाद उच्च न्यायालयात दाखल झालेली रिट याचिका- या दोन महत्त्वाच्या प्रकरणांमध्ये प्रसारमाध्यमांच्या वार्तांकनाला 'वक्तव्यबंदी आदेश' (गॅग ऑर्डर) देण्यात आले आहेत. अलीकडच्या काही दिवसांमधील हे दोन प्रसंग विशेष चिंताजनक ठरतात, कारण ही दोन्ही प्रकरणं सर्वार्थांनी 'अतिमहत्त्वाची' आहेत, आणि साहजिकपणे यातील निकालांमध्ये जनतेला मोठ्या प्रमाणात रस आहे.

या दोन्ही बंदी आदेशांमागची पार्श्वभूमी किंचित भिन्न आहे. (सोहराबुद्दीन शेख खटल्यामध्ये) दोन्ही बाजूंचे साक्षीदार, आरोपी व वकील यांच्यात पूर्वग्रह पेरला जाऊ नये अशा वरपांगी कारणावरून दैनंदिन सुनावणीच्या वार्तांकनापासून माध्यमांना प्रतिबंध करणारा आदेश मुंबईतील केंद्रीय अन्वेषण विभागाच्या (सीबीआय : सेंट्रल ब्यूरो ऑफ इन्व्हेस्टिगेशन) पीठासीन

न्यायाधीश महोदयांनी दिला. सुनावणीच्या वेळी उपस्थित राहाण्याची मुभा माध्यम प्रतिनिधींना आहे आणि सुनावणी पूर्ण झाल्यानंतर बहुधा त्याबद्दल त्यांना वार्तांकनही करता येईल, परंतु दैनंदिन कामकाजाचा तपशील प्रकाशित करण्यापासून त्यांना प्रतिबंध करण्यात आला आहे. बचावपक्षाच्या वकिलानं दाखल केलेल्या लेखी अर्जाव्यतिरिक्त आणखी कशाच्या आधारावर न्यायालयानं हा निष्कर्ष काढला, हे स्पष्ट झालेलं नाही.

दुसरीकडे, उत्तर प्रदेशच्या अतिरिक्त महाअधिवक्त्यांनी सादर केलेल्या चुकीच्या वार्तांकनाच्या काही उदाहरणांचा आधार घेत अलाहाबाद उच्च न्यायालयानं संबंधित प्रकरणी निकाल लागेपर्यंत कामकाजाचा तपशील प्रकाशित करू नये असा आदेश दिला आहे. वर्तमानपत्रांमधील कोणतं वार्तांकन आपल्याला गैर प्रकारचं वाटलं, याचं कोणतंही स्पष्टीकरण उच्च न्यायालयानं दिलेलं नाही. शिवाय, गैरवार्तांकन झालं आहे किंवा न्यायालयातील विधानं संदर्भाविना प्रसिद्ध केली गेली आहेत, या गृहितकाचा प्रतिवाद करण्याची संधी कोणत्याही विशिष्ट पत्रकाराला देण्यात आलेली नाही. निकाल येईपर्यंत न्यायालयीन कामकाजाचं कोणतंही वार्तांकन करता येणार नाही, असा प्रतिबंधात्मक आदेश तेवढा या न्यायालयानं काढला आहे.

या दोन्ही घटनांमध्ये संबंधित न्यायालयांनी ‘सहारा इंडिया रिअल इस्टेट कॉर्पोरेशन लि. विरुद्ध सेक्युरीटीज् एक्सेन्ज बोर्ड ऑफ इंडिया’ (२०१२) १० एससीसी ६०३ या खटल्यातील सर्वोच्च न्यायालयाच्या निकालाचा अवमान केला आहे. या खटल्यामध्ये घटनात्मक खंडपिठानं स्पष्ट केलं होतं की, सुनावणीसंदर्भात प्रसारमाध्यमांकडून होणारं प्रकाशन लांबणीवर टाकण्यासंबंधीचे आदेश देताना न्यायालयांनी संबंधित खटल्याची व्याप्ती आणि आवश्यकता ध्यानात घ्यायला हवी. सुनावणीचं पावित्र्य जपण्यासाठी दुसरा कोणताही उपाय उरलेला नव्हता आणि सुनावणीतील हस्तक्षेप टाळण्यासाठी वार्तांकन प्रलंबित करणं हाच एकमेव आवश्यक मार्ग होता, याबाबत न्यायालयांनी स्वतःचं पूर्ण शंकानिरसन करून घ्यायला हवं. परंतु सदर दोन घटनांमध्ये माध्यमांच्या वार्तांकनांवर बंदी आदेश लादताना संबंधित न्यायालयांनी या दोन अटींचं पालन केलेलं नाही.

अर्थात, माध्यमांवरील अशा बंदी आदेशांसंबंधी केवळ या दोन न्यायालयांवरच टीका करणं योग्य होणार नाही. खुद्द सर्वोच्च न्यायालयानंही पूर्वी अशा प्रकारची खेदजनक कृती केलेली आहे. उज्जैन महाकालेश्वर मंदिरातील पारंपरिक विधींबाबतच्या खटल्यामध्ये सुनावणीचं वार्तांकन करू नये असा तोंडी आदेश सर्वोच्च न्यायालयानं उपस्थित पत्रकारांना दिला होता. खटल्याचा संदर्भ लक्षात न घेता ‘गैरवार्तांकन’ होईल हेच वरपांगी कारण या आदेशामागं होतं, परंतु प्रत्यक्षात अंतिम निकालाच्या बाबतीतच असं गैरवार्तांकन झालेलं दिसलं. सर्वोच्च न्यायालयानं अशाच प्रकारचा आदेश न्यायमूर्ती सी. एस. कर्नान यांच्याबाबतच्या खटल्यातही दिला होता. कलकत्ता उच्च न्यायालयाच्या अवमानाशी संबंधित या खटल्याबाबतच्या कर्नान यांच्या कोणत्याही विधानाचं वार्तांकन करू नये, असा आदेश न्यायालयानं माध्यमसमूहांना दिला होता. अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा अवमान करणारे आदेश अविचारी व निष्काळजी पद्धतीनं देण्याचं काम सर्वोच्च न्यायालयानंही केलेलं आहे, याचे हे केवळ सूचक दाखले आहेत.

माध्यमस्वातंत्र्य आणि न्याय प्रशासन यांच्यात स्वीकारार्ह समतोल साधण्याचं काम नेहमी सहजसोपं नसतं, हे सहारा खटल्यात सर्वोच्च न्यायालयानं मान्य केलं होतं. या पार्श्वभूमीवर आलेले ताजे बंदी आदेश माध्यमस्वातंत्र्यासोबतच न्याय प्रशासनासाठीही विध्वंसक ठरणारे आहेत. पत्रकारांच्या वार्तांकनावर निराधार प्रतिबंध लादण्यापुरतेच हे आदेश मर्यादित

नाहीत; तर आपल्या निर्णयासाठी काळजीपूर्वक कारणं देणं किंवा व्याप्तीची खातरजमा करून घेणं, ही जबाबदारीही या प्रक्रियेत टाळण्यात आली आहे. त्यामुळं, विशेषतः अतिमहत्त्वाच्या खटल्यांमध्ये असे आदेश देणाऱ्या न्यायालयांच्या हेतूंविषयी प्रश्न विचारणं जनतेसाठी आवश्यक बनतं. न्याय नक्की कशा रीतीनं देण्यात आला, हे पाहाण्याची मुभा जनतेला असेल तर न्यायव्यवस्थेवरील विश्वास दृढ राहातो. परंतु अशा महत्त्वाच्या प्रकरणांमध्ये कामकाजाचं वार्तांकन करण्यावर बंदी आणून न्यायालय अभिव्यक्ती स्वातंत्र्याची मुस्कटदाबी करतं आहे, शिवाय खुद्द न्यायव्यवस्थेवरचा जनतेचा विश्वास कमी होण्यासाठीही हे आदेश कारणीभूत ठरत आहेत.

●

---

## भावना दुखावण्याचा खेळ

*स्वतःकडे सत्ता असेल तेव्हाच तुम्हाला भावना दुखवून घेणं परवडतं आणि ते दाखवताही येतं.*

काही शतकांपूर्वी लिहिल्या गेलेल्या महाकाव्यावर आधारित 'पद्मावती' हा हिंदी चित्रपट भारतातील लोकनियुक्त प्रतिनिधींना व माध्यमांना कित्येक आठवडे गुंतवून ठेवतो, ही परिस्थिती पाहाता देशातील निषेधाचं राजकारण कोणत्या दिशेनं चाललं आहे याची चिंता वाटल्यावाचून राहात नाही. सामूहिक हिसाचाराच्या वाढत्या घटनांना मूक राज्यसंस्था प्रोत्साहन देत असल्याचं भारतानं पूर्वीपासून अनुभवलेलं आहे, परंतु राजपुतांसारख्या स्थानिक समुदायानं केलेल्या निषेधाला देशभरातून तत्काळ समर्थक मिळणं, हे लक्षणीय आहे. आपण राजपुतांचं प्रतिनिधित्व करत असल्याचा दावा करत करणी सेना नावाची संघटना यात पुढं आली. या चित्रपटाच्या दिग्दर्शकाचा आणि मुख्य अभिनेत्रीचा शिरच्छेद करावा आणि या चित्रपटावर बंदी आणावी वा तो जाळून टाकावा, अशी मागणी निदर्शकांनी केली आहे. या मागणीला पाच राज्यांच्या मुख्यमंत्र्यांनी (या सर्व राज्यांमध्ये भारतीय जनता पक्षाचं सरकार आहे) आणि भाजपच्याच अनेक लोकनियुक्त प्रतिनिधींनी पाठिंबा दिला आहे.

या चित्रपटामुळं राजपुतांच्या भावना दुखावल्या जातात, त्यांच्या इतिहासाचं विद्रुपीकरण होतं, राणी पद्मिनी व तिच्या सन्मानाचा अवमान होतो, आणि अलाउद्दीन खिल्जी या मुस्लीम सत्ताधीशाला वलयांकित केलं जातं, अशी कारणं देऊन या मंडळींनी चित्रपटाबाबत आक्षेप नोंदवले आहे. या चित्रपटाच्या निर्मितीवेळी राजपूत 'समुदाया'शी सल्लामसलत करण्यात आली नाही, याबद्दलही निषेधकर्त्यांनी नाराजी व्यक्त केली आहे. मुख्य म्हणजे या चित्रपटात खिल्जी व पद्मावती यांच्यातील जवळकीची काही दृश्यं आहेत आणि बहुधा त्यांच्यातील प्रणयाचं चित्रणही आहे, ही भीती या निषेधकर्त्यांना सर्वाधिक सतावते आहे.

'इतिहासाच्या विद्रुपीकरणा'विषयीचे असे आरोप एका व्यापक व वारंवार निर्माण होणाऱ्या अस्वस्थतेचा भाग आहेत. भारतातील मध्ययुगीन 'मुस्लीम' सत्ताधीशांच्या संदर्भात भारताच्या 'खऱ्या' इतिहासाची स्वयंकल्पना मांडण्याशी ही अस्वस्थता जोडलेली आहे. या स्वयंकल्पनेचा अर्थ कसा लावला जातो याचा ताण कल्पित अथवा वास्तवातील स्त्रीपात्रालाच निरपवादपणे सहन करावा लागतो. यातील एकाही निषेधकर्त्यानं चित्रपट पाहिलेला नाही, हे वेगळं नोंदवायचीही गरज नाही. न पाहिलेल्या चित्रपटावरून हत्येची धमकी देणाऱ्या करणी सेनेचे प्रमुख लोकेंद्र सिंह कलवी यांना या संदर्भात प्रश्न विचारण्यात आल्यावर ते म्हणाले की, त्यांनी या चित्रपटाचा ट्रेलर पाहिलेला आहे आणि त्यामध्ये पद्मावतीचे पती रतन सिंग शेळीसारखे दिसतात आणि अलाउद्दीन खिलजी

एखाद्या राक्षसासारखा दिसतो.

दिग्दर्शकानं खिल्जीला पशुवत का दाखवलं, हा प्रश्न मात्र काही मोजक्या लोकांनीच विचारला आहे. मटण खात असताना त्यावर हल्ला केल्यासारखा हा मुस्लीम सम्राट का वागतो, तो एवढा खडबडीत आणि विस्कटलेला का आहे, त्याच्या मध्ययुगीन सैन्याकडं 'इस्लामिक स्टेट' व पाकिस्तान यांच्या झेंड्यांशी साधर्म्य वाटणारे ध्वज का आहेत?

आपल्याला आसुरी स्वरूपात दाखवल्याबद्दल या चित्रपटाविरोधात काही मुस्लिमांनी निषेध नोंदवला असता, तर काय झालं असतं, याचा विचार करणं रोचक ठरेल. देशातील सध्याच्या वातावरणात अशा चित्रणामुळं आपल्याला शांततेनं जीवन जगण्यात आणखी अडथळे सहन करावे लागतील, असं ते म्हणाले असते तर काय झालं असतं? मुस्लिमांविषयीच्या सर्व प्रकारच्या साचेबद्ध प्रतिमांना जागा करून देण्याचं काम संजय लीला भन्साळींनी छोट्याशा ट्रेलरमध्येही केलेलं दिसतं. सभ्यतांचा संघर्ष (क्लॅश ऑफ सिव्हिलायझेशन्स) होत असल्याचं कथन विकण्याचा त्यांचा प्रयत्न आहे. तरीही, कोणत्याही मुस्लिम व्यक्तीनं याचा निषेध नोंदवलेला नाही. परंतु त्यांनी असा निषेध नोंदवणारी निदर्शनं केली असती तर राज्यसंस्थेनं कसा प्रतिसाद दिला असता, याची आपण कल्पना करू शकतो. खरं तर एका कल्पितकथेवर आधारित चित्रपटातील गैरचित्रणाविरोधात आवाज उठवण्याची चंगळ मुस्लिमांना परवडणारीही नाही. देशात जमावाकडून होणाऱ्या हत्यांचा 'साथीचा आजार' वाढत असताना त्या विरोधातही निषेध नोंदवणं त्यांना शक्य झालेलं नाही. वास्तविक या हत्यांमुळं सार्वजनिक ठिकाणी प्रवास करणंही भयग्रस्त बनलं आहे. शिवाय, विद्यमान सरकारनं मुस्लिमांच्या अन्नसवयी, उपजीविकेची साधनं आणि प्रतिष्ठा यांच्यावरही निष्ठूरपणे घाला घातला असतानाही त्या विषयी मुस्लीम समुदायातून निषेधाचे सूर उमटू शकलेले नाहीत.

अर्थात, 'भावना दुखावल्या'च्या नावाखाली अंदाधुंदी माजवायचा समान अधिकार सर्व समुदायांना असायला हवा, असं इथं सुचवायचं नाहीये; परंतु, अशा कथित भावना दुखावल्याच्या तक्रारी करण्यासाठीही प्रचंड सत्ता असावी लागते, याकडं निर्देश करणं गरजेचं वाटतं. सत्ता असेल तेव्हा तुम्हाला भावना दुखवून घेणं परवडतं आणि त्याचं प्रदर्शनही करता येतं. भावना दुखावून घेण्यासाठीही या देशामध्ये विशिष्ट प्रकारची बेदरकारी असावी लागते, आपल्या शिक्षा होणार नाही या आश्वस्ततेतून ती येते. हिंसक होण्याचा अधिकार केवळ काही मोजक्या विशेषाधिकाऱ्यांना असतो.

'दुखावलेल्या भावनां'च्या या खेळात निरुद्देश जमातवाद, खोलवर रुजलेली पितृसत्ता, जातीय अभिमान या घटकांचा समावेश आहेच; शिवाय, चित्रपटाचा दिग्दर्शक व त्याच्याविरोधात रक्तपिपासू बनलेले निषेधकर्ते यांची दोघांचीही भिन्नलिंगी प्रणयाला रोमांचक बनवण्यासंबंधी काही समान गृहितकं आहेत का, हेही तपासणं गरजेचं आहे. दोघांसाठीही स्त्री ही एकाच वेळी सन्मान आणि लालसा यांचं प्रतिनिधित्व करणारी वस्तू आहे. करणी सेनेच्या दृष्टीनं खल्जीचं क्रौर्य हेवा करण्याजोगं आहे कारण त्यातूनच त्याचं पुरुषत्व घडतं; हिंसक होण्याची त्याची क्षमता बळाशी संबंधित आहे, कमकुवतपणाशी नाही. या अर्थी करणी सेना 'शेळी'सदृश हिंदूपेक्षा 'राक्षसी' मुस्लिमाशी जवळीक साधू पाहील. परंतु, हिंदू स्त्रीला मुस्लिम 'क्रूरकर्म्या'मध्ये रस वाटण्याची शक्यता मात्र या सेनेला सहन होत नाही. अशा प्रकारच्या शक्यतेनं राजपुतांच्या गाभ्याला धक्का बसतो.

भन्साळींनी राजपुतांचा अभिमान व सन्मान यांचं 'साजरीकरण' करणं हे एका विशिष्ट राजकारणात रुजलेलं आहे, त्यामुळं हा केवळ कलात्मक स्वातंत्र्याशी संबंधित वाद नाही, हे शेवटी स्पष्ट करणं आवश्यक

आहे. आपल्या समजुतीच्या ‘इतिहासा’बाबत दिग्दर्शकानं घेतलेल्या तथाकथित कलात्मक स्वातंत्र्याला विरोध करणारे लोक आजच्या राजस्थानातील स्त्रियांच्या वास्तवाविषयी फारशी चिंता करत नाहीत. आपल्या ‘सन्माना’च्या निरर्थक भावनेचा भंग करणाऱ्यांना खुनाची वा इजा करण्याची धमकी हे लोक देतात, परंतु राजस्थान हे राज्य सामाजिक निर्देशांकाच्या बाबतीत सर्वांत खालच्या क्रमांकावर आहे, त्याची फिकीर करावीशी त्यांना वाटत नाही.

‘पद्मावती’ चित्रपटासंदर्भातील या पेचप्रसंगानं भारताच्या भविष्याचा कुरूप चेहरा उघड केला आहे. निरर्थक निषेध–निदर्शनांच्या स्वरूपात लक्ष विचलित करण्याला प्रोत्साहन देणारे लोक आज सत्तेत आहेत. माणसांची नाकं वा हातपाय आणि मुंडकी उडवण्याची भाषा उघडपणे करणारे लोक वाढत आहेत आणि समाजाचं असं तालिबानीकरण होत असतानाही सत्ताधारी त्याकडं काणाडोळा करतात. निषेधाच्या या राजकारणामागील खऱ्या उद्देशांबाबत सर्जनशील समुदाय मात्र निश्चल राहिलेला आहे. या राजकारणाचा परिणाम म्हणून अखेरीस ‘कलात्मक स्वातंत्र्या’च्या संकल्पनेलाही सुरुंग लागू शकतो.

●

---

## परिघावर जगण्याची सक्ती

*लिंगांतरित (ट्रान्सजेन्डर) व्यक्तींसंबंधीचं प्रस्तावित विधेयक असंवेदनशील आणि प्रतिगामी आहे.*

लिंगांतरित, आंतरलिंगी व भिन्नलिंगी व्यक्तींच्या समुदायानं संघर्षांद्वारे आणि याचिकांद्वारे प्रदीर्घ लढा देत मिळवलेले अधिकार काढून घेणारं विधेयक संसदेच्या आगामी अधिवेशनात मांडण्याचा प्रस्ताव सरकारनं ठेवला आहे. यामुळं भारतातील लिंगांतरित समुदाय व लैंगिक अल्पसंख्याकांच्या अधिकारांसाठी लढणारे कार्यकर्ते यांना धक्का बसला असून त्यांनी याबाबत संतापही व्यक्त केला आहे. सरकारनं २०१४ साली नियुक्त केलेली तज्ज्ञ समिती, सर्वोच्च न्यायालयाचा २०१५ सालचा निकाल आणि राज्यसभेनं २०१५ साली एकमतानं मंजूर केलेलं खाजगी सदस्याचं एक विधेयक या तीनही घटकांनी लिंगांतरित समुदायाच्या गरजांविषयी व्यापक समजुतीची भूमिका घेतली होती; परंतु सरकारनं प्रस्तावित केलेलं ‘लिंगांतरित व्यक्ती (अधिकारांचं संरक्षण) विधेयक, २०१६’ या समजूतदारपणाच्या विरोधात जाणारं आहे. सामाजिक न्याय व सबलीकरण यासंबंधीच्या संसदीय स्थायी समितीनं या विधेयकाबद्दल सादर केलेला ४३वा अहवाल सरकारनं फेटाळला आहे, ही त्याहूनही भयंकर गोष्ट म्हणावी लागेल. लिंगांतरित, आंतरलिंगी व भिन्नलिंगी नागरिकांच्या समुदायाच्या मागण्यांकडं दुर्लक्षित केल्याबद्दल प्रस्तुत विधेयकावर स्थायी समितीनं टीका केली होती.

लिंगातरित ओळखीची व्याख्या, स्वओळखीचा अधिकार, आपल्याच जवळच्यांनी संबंध तोडल्यावर लिंगांतरित व्यक्तींना गरजेच्या असणाऱ्या पर्यायी कौटुंबिक रचना, शैक्षणिक दुरावस्था व खालावलेलं जीवनमान यांवरचा उतारा म्हणून आरक्षण, त्यांच्याविरोधात भेदभाव करणाऱ्यांसाठी दंडाची तरतूद– इत्यादी विविध मुद्द्यांवर विद्यमान विधेयक प्रतिगामी भूमिका घेतं. मानव्य विकास, ओळख आणि स्वजाणीव घडण्यासाठी लैंगिकता हा मध्यवर्ती घटक असतो, हे आता स्वीकारलं गेलं आहे. व्यक्तीचं ‘लिंग’ ही जैविक बाब आहे, तर ‘लिंगभाव’ हे सामाजिक रचित आहे, या विचाराला आता आव्हान तरी दिलं जात नाही. परंतु प्रस्तुत विधेयकात यातील कशाचीच दखल घेण्यात आलेली नाही. लिंगांतरित व्यक्तींची व्याख्या करताना यांमध्ये वापरलेल्या संज्ञा हास्यास्पद आहेत

आणि अतिशय प्रतिगामी आहेत. विधेयकात म्हटलं आहे: जी व्यक्ती पूर्णतः स्त्री नाही वा पूर्णतः पुरूष नाही; किंवा स्त्री व पुरुष यांचा संयोग आहे; किंवा स्त्री वा पुरुष नाही; आणि जन्मावेळी मिळालेल्या लिंगभावाशी ज्या व्यक्तीची लिंगभावात्मक जाणीव जुळत नाही तिला लिंगांतरित व्यक्ती म्हणता येतं; आणि यांमध्ये लिंगांतरित पुरुष व लिंगांतरित स्त्रियांचा, आंतरलिंगी व्यक्तींचा व लिंगविचित्र व्यक्तींचाही समावेश होतो. सामाजिक, कायदेशीर व वैद्यकीयदृष्ट्या पुरुष वा स्त्री ठरवण्यात आलेल्या, परंतु ती आपली स्वओळख अथवा/आणि अभिव्यक्ती आहे असं न मानणाऱ्या व्यक्तींना लिंगांतरित मानावं, अशी सूचना या समुदायानं केली आहे. लिंगांतरित व्यक्ती आंतरलिंगी असतील किंवा असणार नाहीत, त्याचप्रमाणे आंतरलिंगी व्यक्ती लिंगांतरित असतील किंवा असणार नाहीत. पुरुष वा स्त्री असण्याच्या सामाजिक, कायदेशीर व वैद्यकीय कोटींशी न जुळणारे अविशिष्ट लैंगिक गुण (शरीरशास्त्रीय, गुणसूत्रीय, संप्रेरकीय, इत्यादी गुण) असणाऱ्या व्यक्तींना आंतरलिंगी म्हणावं, अशी व्याख्या या विधेयकानं केली आहे.

लिंगभावात्मक ओळख निश्चित करण्यासंबंधी एका महत्त्वाच्या मुद्द्याबाबतचा निकाल 'राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण विरुद्ध भारतीय संघराज्य, २०१५' या खटल्यात सर्वोच्च न्यायालयानं दिला होता. यानुसार शारीरिक छाननीशिवाय स्वओळख ठरवायचा समुदायाचा अधिकार मान्य करण्यात आला होता. किंबहुना, सद्यस्थितीत लिंगांतरित व्यक्ती प्रतिज्ञापत्राद्वारे आपल्या इच्छेनुसार लिंगभावाची घोषणा करू शकते. ताज्या विधेयकामध्ये हा अधिकार काढून घेण्यात आला आहे आणि यासंबंधीचा निर्णय घेण्याचा अधिकार जिल्हा छाननी समित्यांना देण्यात आला आहे; या समितीमध्ये एक प्रमुख वैद्यकीय अधिकारी, एक मानसोपचारतज्ज्ञ किंवा मानसशास्त्रज्ञ, इत्यादींचा समावेश असेल. अशा प्रकारच्या तरतुदीमुळं होणारी छळवणूक व प्रशासकीय अडथळे यांची कल्पना करणं अवघड नाही. सामाजिक लाभ उपलब्ध व्हावेत यासाठी जात अथवा अपंगत्वाची प्रमाणपत्रं सादर करावी लागणाऱ्यांना जे अनुभव येतात त्याच्याशी साधर्म्य सांगणारी ही यंत्रणा असेल. भारतीय राज्यघटना 'लिंगांध' आहे आणि स्त्रियांसाठी विशेष तरतुदी करायला हव्यात असं सांगणाऱ्या कलमांचा अपवाद वगळता राज्यघटनेमध्ये व्यक्तीचं लिंग अप्रस्तुत आहे, असा आश्चर्यकारक प्रतिसाद सामाजिक कल्याण मंत्रालयानं स्थायी समितीला दिला!

आधाराचा अभाव असल्यामुळं व कुटुंबाकडून समजून घेतलं न गेल्यामुळं अनेक पौगंडावयीन आणि किशोरवयीन मुलामुलींना सहन कराव्या लागणाऱ्या दुर्दशेकडंही या विधेयकानं दुर्लक्ष केलं आहे. कोणत्याही लिंगांतरित व्यक्तीच्या हितासाठी सक्षम न्यायालय आदेश देत नाही तोपर्यंत या व्यक्तीला तिच्या पालकांपासून वा निकट कुटुंबापासून विभक्त करू नये, आणि कुटुंबाला या व्यक्तीला सांभाळणं शक्य नसेल तर तिला पुनर्वसन केंद्रामध्ये दाखल करावं, असं या विधेयकात म्हटलं आहे. कुटुंबाची व्याख्या व्यापक करावी आणि त्यामध्ये हिजडा वा अरावनी समुदायातील ज्येष्ठांचा समावेश करावा, कारण हे घटक तरुण लिंगांतरित मुलांना स्वीकारतात आणि त्यांना संभाव्य धोक्यांपासून दूर ठेवतात, अशी मागणीही लिंगांतरित समुदायाकडून दीर्घ काळ होत आलेली आहे. शिवाय, हिजडा कुटुंबव्यवस्थेवर गुन्हेगारीचा शिक्का मारू नये, अशीही मागणी केली गेली आहे. आरोग्य व सकारात्मक कृती यांविषयी या विधेयकानं मौन धारण केलेलं आहे. परिघावरील लिंगांतरित समुदायांना उपजीविकेसाठी कराव्या लागणाऱ्या कामांना गुन्हेगारी न मानण्याच्या मुद्द्याचीही दखल विधेयकानं घेतलेली नाही. या समुदायाविरोधातील अत्याचाराच्या घटनांबाबत आणि या समुदायातील सदस्यांना तुरुंग व सुधारगृहांमध्ये संरक्षण लाभावं यासाठी कोणत्याही

प्रकारच्या दंडात्मक कायदेशीर तरतुदी करण्यात आलेल्या नाहीत.

अतिशय व्यामिश्र मुद्द्यावरील सरकारचा उथळ दृष्टिकोन यातून स्पष्ट होतो. लिंगांतरित व्यक्तींना (हिजडा अथवा अरावनी) सर्वसाधारणपणे टिंगलीला सामोरं जावं लागतं व त्यांना टाळलं जातं. किंबहुना त्यांना कायदेशीर मान्यताही अगदी अलीकडंच मिळाली आहे. या वंचनेमुळं त्यांच्या राजकीय व सामाजिक-आर्थिक प्रक्रियांमधील सहभागावर विपरित परिणाम झाला. पोलीस व सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेच्या हातून त्यांना मिळणारी वागणूक क्रूर व असंवेदनशील असते. अशा प्रकारच्या विधेयकावरून केवळ विद्यमान सरकारचीच नव्हे तर आपल्या समाजाचीही पातळी दिसून येते, याकडं दुर्लक्ष होऊ नये. ●

---

## पुन्हा एकदा 'चतुष्कोन'

*'नियमाधारित व्यवस्थे'च्या नावाखाली ऑस्ट्रेलिया, भारत व जपान हे देश आशिया-पॅसिफिक प्रदेशामधील अमेरिकी प्रभुत्वाला पाठिंबा देत आहेत.*

नोव्हेंबरच्या मध्यात मनिलामध्ये झालेल्या पूर्व आशिया शिखरबैठकीच्या दरम्यान ऑस्ट्रेलिया, भारत, जपान व अमेरिका यांच्यात एक उच्चस्तरीय बैठक झाली. हिंद-पॅसिफिक प्रदेशामध्ये नियमाधारित व्यवस्था राहावी आणि आंतरराष्ट्रीय कायद्याचा आदर राखला जावा, वाहतुकीचं आणि विमानप्रवासाचं स्वातंत्र्यही शाबूत राहावं यासाठी तजवीज केली जाईल, अशी प्रतिज्ञा या बैठकीत करण्यात आली. ही सर्व भाषा चीनला उद्देशून होती, परंतु त्याचा नामनिर्देश मात्र करण्यात आला नाही. ऑस्ट्रेलियाच्या परराष्ट्र मंत्रालयानं म्हटल्यानुसार, हिंद-पॅसिफिकमधील समुद्री सुरक्षा राखण्याचं आणि उत्तर कोरियाच्या आण्विक व क्षेपणास्त्र कार्यक्रमांसह इतर धोक्यांवर उपाय करण्याचं अभिवचन या चार देशांनी प्रस्तुत बैठकीत दिलं.

या चार देशांच्या गटाला बोलीभाषेत 'क्काड' (क्काड्रयँगल/चतुष्कोन) असं संबोधलं जातं. हा चार देशांचा गट आंतरराष्ट्रीय कायदा व नियमाधारित व्यवस्था यांचा आदर राखण्यावर आधारलेला आहे, असा दावा करण्यात आला. परंतु प्रत्यक्ष व्यवहारामध्ये खुद्द अमेरिकाच अशा कायद्याची फारशी फिकीर करताना दिसत नाही. आंतरराष्ट्रीय गुन्हेगारी न्यायालयापासून अमेरिकेनं दुरावा राखला आहे, संयुक्त राष्ट्रांच्या अधिकृत संमतीशिवाय कोणत्याही देशात वा प्रदेशात सैनिकी हस्तक्षेप करण्याचा अधिकार आपल्याला आहे असं अमेरिका गृहीत धरते, आपण 'दहशतवादी' मानलेल्यांची ड्रोनद्वारे क्षेपणास्त्र डागून हत्या करण्याचे आदेशही अमेरिका देते, या सर्व प्रक्रियेत अनेक नागरिकांचाही जीव जातो, परंतु याला 'आनुशंगिक हानी' मानलं जातं. अशा बेकायदेशीर कृत्यं करणाऱ्या हिंसक साम्राज्यवादी सत्तेची साथ देण्याची परवानगी भारत, ऑस्ट्रेलिया व जपानमधल्या नागरिकांनी आपापल्या सरकारांना द्यावी का?

२००७ साली अमेरिकेचे तत्कालीन उप-राष्ट्राध्यक्ष डिक चेनी आणि जपानी पंतप्रधान शिन्झो आबे यांनी 'चतुष्कोन' गटासाठी पुढाकार घेतला आणि ऑस्ट्रेलियाचे पंतप्रधान जॉन होवार्ड व भारताचे पंतप्रधान मनमोहन सिंग यांनी या उपक्रमाला पाठिंबा देण्याला संमती दिली. सोव्हिएत युनियनचा पाडाव झाल्यानंतर १९९२ सालीच अमेरिका व भारत यांच्या नौदलांनी वार्षिक 'मलबार कवायतीं'ना सुरुवात केली होती. २००७ साली या कवायतींमध्ये भारत आणि अमेरिकेच्या नौदलांसोबत जपानचं नौदल (समुद्री स्वसंरक्षण दल) सहभागी झालं. त्या वर्षीच्या कवायती ओकिनावा या जपानी बेटाजवळ झाल्या. शिवाय,

बंगालच्या उपसागरात झालेल्या कवायतींमध्ये ऑस्ट्रेलिया व सिंगापूर यांनीही सहभाग घेतला, त्यामुळं मलबार कवायतींचा उपक्रम केवळ द्विराष्ट्रीय स्वरूपाचा राहिला नाही. परंतु, ऑस्ट्रेलियानं २००८ साली मलबार कवायती आणि चतुष्कोन गट यांमधून माघार घेतली. अर्थात इतरत्र अमेरिकेसोबतच्या सैनिकी सहकार्याला ऑस्ट्रेलियानं बाधा पोचू दिली नाही. २०१५ सालपासून मलबार कवायतींमध्ये जपान हा कायमस्वरूपी सहभागी सदस्य झाल्याचं दिसतं आहे. आता चतुष्कोनी गटाचं पुनरुज्जीवन झाल्यावर भारताच्या यजमानीखाली होणाऱ्या या कवायतींमध्ये ऑस्ट्रेलियाचाही समावेश असेल अशी शक्यता आहे.

वॉशिंग्टन डीसीमधील 'सेंटर फॉर स्ट्रॅटेजिक अँड इंटरनॅशनल स्टडीज्' या संस्थेत ऑक्टोबरमध्ये अमेरिकेचे परराष्ट्र मंत्री रेक्स टिलरसन यांनी 'आगामी शतकासाठी भारतासोबतच्या आपल्या संबंधांना आकार देण्याविषयी' एक व्याख्यान दिलं. जपान व ऑस्ट्रेलियासोबतच्या अमेरिकेच्या दीर्घकालीन आघाडीच्या बरोबरीनं भारतासोबतच्या सैनिकी-सामरिक भागीदारीकडं ट्रम्प सरकार कशा रीतीनं पाहातं, हे समजून घेण्यासाठी टिलरसन यांच्या या व्याख्यानाचा दाखला घेणं महत्त्वाचं ठरतं. चीनला चाप बसवण्यासाठी भारत-अमेरिका-जपान यांच्या विद्यमान उपक्रमांमध्ये ऑस्ट्रेलियाचा समावेश करावा, असं निःसंदिग्ध आवाहन टिलरसन यांनी केलं. या चतुष्कोनी गटाच्या प्रस्तावित पुनरुज्जीवनामध्ये सहभागी होण्याची तयारी भारतानं लगोलगच दाखवली. खरं तर, या गटाच्या 'रूपरेषे'विषयीचा करारही अजून प्रलंबित आहे. भारत हा अमेरिकेचा 'मुख्य संरक्षणविषयक भागीदार' आहे, त्यामुळं अमेरिकेच्या सैनिकी-औद्योगिक संकुलाकडून उच्च तंत्रज्ञानावर आधारित शस्त्रास्त्रं खरेदी करण्यासाठी भारत पात्र ठरतो. शिवाय, 'लॉजिस्टिक्स एक्सेंज मेमोरॅन्डम ऑफ ॲग्रीमेन्ट' अंमलात आल्यामुळं भारतीय सैनिकी तळांचा वापर करण्याची मुभा अमेरिकी युद्धविमानांना आणि युद्धनौकांना मिळाली आहे.

चीनच्या उदयाला चाप बसवण्यासाठीच्या अमेरिकेच्या प्रयत्नांमध्ये भारतानं सहभागी व्हायची काय गरज आहे, असा प्रश्न आपल्याला विचारता येईल. स्वतःच्या आर्थिक उदयाला साजेशा प्रमाणात चीनच्या सैनिकी व भूराजकीय सत्तेत वाढ झालेली नाही. आशिया-पॅसिफिक प्रदेशामध्ये आणि अर्थातच जगामध्ये अमेरिका ही अजूनही अग्रणी सत्ता आहे. संरक्षणविषयक आर्थिक तरतुदीची व्याप्ती, सैन्याचा आकार, आण्विक क्षमता, आणि परराष्ट्रांमधील सैनिकी तळ अशा कोणत्याही निकषांवर कोणताही देश अमेरिकेच्या आसपासही येत नाही. परंतु, तरीही चीनचा आर्थिक उदय आणि त्यासोबत काहीसा वाढलेला भूराजकीय प्रभाव अमेरिकेच्या आशिया-पॅसिफिक प्रदेशातील प्रभुत्वाला निश्चितपणे अडचणीचा ठरतो आहे. अर्थात, अमेरिकेच्या सुरक्षेला मात्र यातून अजिबातच धोका नाही.

पूर्व चिनी आणि दक्षिण चिनी समुद्रासंदर्भातील वादांबाबत कोणताही संबंधित देश निरपराध नाही. चीनच्या दाव्यांप्रमाणे इतरही देशांचे दावे बेगडी आणि असमर्थनीय ठरू शकतात. विशेष म्हणजे या वादात सर्वाधिक गदारोळ करणाऱ्या अमेरिकेनं अजून समुद्री कायद्याविषयीच्या संयुक्त राष्ट्रांच्या नियमावलीवर देशांतर्गत कायदेशीर शिक्कामोर्तब केलेलं नाही. चिनी अर्थव्यवस्थेच्या सातत्यपूर्ण वाढीला अडथळा आणण्यासाठी व्यापारी मार्गांना सैनिकी चाप बसवण्यासाठीची पावलं अमेरिका उचलू शकते. असं करताना आंतरराष्ट्रीय कायदा व वाहतुकीचं स्वातंत्र्य हे मुद्दे धाब्यावर बसवण्याचीही अमेरिकेची तयारी असेल. मुळात चीनकडून असलेला कथित धोका व्यावसायिक नौका वाहतुकीच्या स्वातंत्र्यासंदर्भातला नाही. पूर्व चिनी आणि दक्षिण चिनी समुद्रातील व्यावसायिक वाहतुकीला अडथळा आणून स्वतःच्याच हितसंबंधांना चीन हानी पोचवेल, अशी शक्यता नाही. स्पष्टपणे

सांगायचं तर, भारत, जपान व ऑस्ट्रेलिया यांना हवी असलेली आंतरराष्ट्रीय नियमांवर आधारित व्यवस्था म्हणजे आशिया-पॅसिफिक प्रदेशातील अमेरिकी साम्राज्यवादाच्या प्रभुत्वाखालील व्यवस्था आहे.●

## शेवटचा आफ्रिकी मुक्तिदाता

*रॉबर्ट मुगाबे यांचा पाडाव झिम्बाब्वेसाठी केवळ तात्कालिक उपाय ठरू शकतो.*

रॉबर्ट मुगाबे बहुधा अमर्याद काळापर्यंत झिम्बाब्वेचं राष्ट्राध्यक्षपद स्वतःकडं राखतील अशी परिस्थिती होती, परंतु त्यांना पद सोडावं लागलं आहे. त्यानंतर या देशाची सूत्रं हातात घेतलेल्या इमर्सन मांगाग्वा यांनी स्वातंत्र्य व संपन्नतेच्या भवितव्याची हमी दिली आहे. या सर्व घडामोडींनंतर अत्यानंद व्यक्त केला जात असला तरी वास्तवाचा अदमास घेण्याचं काम क्वचितच काही जणांनी केलेलं आहे. मुगाबे हे मांगाग्वा यांचे एकेकाळचे मार्गदर्शक होते आणि आता त्यांच्याकडून मांगाग्वा यांना मिळालेला वारसा कटु विभाजन झालेल्या पक्षयंत्रणेचा आहे. या पक्षातील गटातटांमधील भांडणं सक्तीनं सोडवण्याची मुगाबे यांनी रूढ केलेली पद्धतही या वारशाचा भाग आहे.

मुगाबे यांना राजीनामा देण्याची संधी देण्यात आली. दोन दशकं जागतिक बहिष्कृतता सहन करताना देश टिकवण्यासाठी मुगाबे यांना स्वतःभोवतीचं मुक्तिदात्याचं वलय कायम ठेवणं गरजेचं वाटलं. त्यामुळं त्यांची गच्छंती होत असतानाही प्रतिष्ठेचा आभास राहावा, अशी तजवीज सैन्यदलानं केली. या सैन्यावर वसाहतवादविरोधी युद्धातील अनुभवी बुजुर्गांचं प्रभुत्व आहे. परंतु मुगाबे यांना राजीनामा दिल्यावर स्वतःच्या काही लख्ख घोडचुकांचाही त्याग करावा लागला असता. विशेषतः आपल्यानंतर राष्ट्राध्यक्षपदाच्या स्पर्धेत आपली दुसरी व तरुण पत्नी ग्रेस यांना झुकतं माप देण्याचे त्यांचे प्रयत्न अलीकडे सुरू होते, ही चूक त्यांना महागात पडली.

शेवटी, झिम्बाब्वेच्या संसदेनं महाभियोग चालवून मुगाबे यांना सक्तीनं राजीनामा द्यायला लावला. मंगाग्वा यांना उपराष्ट्राध्यक्ष पदावरून हटवल्यानंतर या घटनाक्रमाला सुरुवात झाली होती, त्यानंतर काही काळ त्यांना दक्षिण आफ्रिकेत आश्रय घ्यावा लागला, आणि आता ते विजयी आवेशात सत्तेवर आले आहेत. परंतु या विखंडित देशामध्ये सलोखा स्थापण्यासाठी ते पुरेसे कार्यक्षम आहेत का, हा कळीचा प्रश्न आहे. युद्धानुभवी बुजुर्ग हे मुगाबे यांच्या सत्तेचे मुख्य आधारस्तंभ होते. यातील काही जण स्वतंत्र झिम्बाब्वेच्या सैन्यामध्ये अधिकारी पदांवर गेले, तर काही जणांनी शेती करण्यासाठी ग्रामजीवन स्वीकारलं होतं. या बुजुर्ग सेनाधिकाऱ्यांनी निष्ठा बदलल्यामुळं मंगाग्वा यांना सत्ता काबीज करता आली. आता आपल्या पूर्वसुरीप्रमाणे क्लृप्त्या करून ही सत्ता टिकवायची की सलोखास्थापनेच्या प्रामाणिक प्रक्रियेद्वारे सत्ता चालवायची, हे त्यांना ठरवावं लागणार आहे.

'झिम्बाब्वे आफ्रिकन नॅशनल युनियन-पॅट्रिऑटिक फ्रंट' (झेडएएनयू-पीएफ) या सत्ताधारी पक्षामध्ये ग्रेस मुगाबे यांनी एक गट सुरू केला होता, त्यांना आता जोरदार फटका बसला आहे. पण हा गट संपुष्टात आलेला नाही. या गटाची ऊर्जा मुख्यत्वे नागरी भागांमधून येते- त्यातही स्वातंत्र्यानंतरच्या काळात वयात आलेली पिढी या गटाच्या पाठीशी आहे. त्यांची गाऱ्हाणी ऐकून घेणं व त्यावर उपाययोजना करणं ही मंगाग्वा यांच्या राजकीय कौशल्यांची मुख्य परीक्षा ठरणार आहे.

स्वातंत्र्यकाळापासून (त्या दरम्यानच्या अंतर्गत यादवीपासून) झिम्बाब्वेच्या इतिहासात मंगाग्वा हे एक सक्रिय घटक राहिले आहेत. झिम्बाब्वेला स्वातंत्र्य

मिळाल्यानंतर पहिल्या दशकामध्ये अंतर्गत सुरक्षा मंत्री म्हणून आणि नंतर न्याय मंत्री म्हणून त्यांनी जोशुआ नकोमो यांच्या नेतृत्वाखालील 'झिम्बाब्वे आफ्रिकन पीपल्स युनियन' (झेडएपीयू) या प्रतिस्पर्धी स्वातंत्र्यवादी चळवळीला क्रौर्यानं दडपण्यात सहभाग घेतला होता.

त्या वेळी शीतयुद्धातील शत्रुत्वाचं तेल आफ्रिकेच्या दक्षिण भागांमध्येही ओतलं जात होतं. विशेषतः अंगोला व मोझाम्बिक ही नव्यानं स्वतंत्र झालेली राष्ट्रं या काळात धगधगत होती. स्वातंत्र्याची धुरा हातात घेण्यासाठी प्रयत्नशील असलेले प्रतिस्पर्धी गट इथं कार्यरत होते आणि शीतयुद्धातील अमेरिका व रशिया या दोन महासत्तांकडून यातील एकेका गटाची पाठराखण केली जात होती. या दोन्ही देशांच्या बाबतीत पाश्चात्त्यांशी लढणाऱ्या स्वातंत्र्यवादी दलांना राष्ट्रीय वैधता मिळाली. झिम्बाब्वेमध्ये १९८०च्या दशकात हिंसक यादवी संघर्ष होऊनही तितक्या प्रमाणात या देशाला जागतिक पातळीवर तिरस्कार सहन करावा लागला नाही, याचं एक कारण हे होतं की, या देशातील सत्ताधारी गट पाश्चात्त्य राष्ट्रांनी निर्देशित केलेल्या नियमांनुसार कार्यरत होता. त्यामुळं तिथल्या गौरवर्णीयांच्या विशेषाधिकारी अवकाशांनाही धक्का पोचला नाही.

दक्षिण आफ्रिकेला शीतयुद्धकालीन तणावाचा तितकासा त्रास झाला नाही, त्यामुळं १९९०च्या दशकाच्या सुरुवातीला तिथं बऱ्यापैकी सुरळीतपणे बहुमताची सत्ता आली. या सर्व काळात झिम्बाब्वे पाश्चात्त्यांशी सलगी साधून होता. गंभीर आर्थिक संकटांना तोंड देताना या देशानं आंतरराष्ट्रीय नाणे निधीच्या आदेशांनुसार कठोर रचनात्मक तडजोडींचा कार्यक्रम राबवला.

१९९८ साली पहिल्यांदा झिम्बाब्वेनं पाश्चात्त्यांना पटणार नाही असं पाऊल उचललं आणि लौरन्ट काबिला यांच्या दलांना पाठिंबा देत काँगोमध्ये सैनिकी हस्तक्षेप केला. स्वातंत्र्ययुद्ध काळातील आपल्या सहकाऱ्यांच्या वाढत्या आकांक्षांना आळा घालण्याच्या प्रयत्नांमध्ये मुगाबे अपयशी ठरत आहेत, याचे स्पष्ट संकेत देणारी ही घटना होती. सैनिकी हस्तक्षेपाद्वारे जोसेफ काबिला यांच्याशी असलेलं राजकीय सख्य टिकवणं हा एक अंतःस्थ हेतू असू शकतो, परंतु काँगोच्या संपन्न खनिज साठ्यामध्ये झिम्बाब्वेच्या उच्चपदस्थ सेनाधिकाऱ्यांना वाटा मिळवून देणं हा यामागचा व्यापक उद्देश होता. काँगोमधील हिऱ्यांच्या बेकायदेशीर व्यापारातून नफा झालेल्या राजकीय नेत्यांमध्ये मंगाग्वा यांचाही समावेश असल्याचं २००२ साली संयुक्त राष्ट्रांनी केलेल्या चौकशीत उघड झालं होतं.

यातून मग पाश्चात्त्यांच्या मनात झिम्बाब्वेविषयी रोष उत्पन्न झाला. परंतु या रोषाचं टोक गाठलं जाण्याची वेळ २००० साली आली– या वर्षी झिम्बाब्वेनं 'वेगवान जमीन सुधारणां'चा मार्ग चोखाळला. स्वातंत्र्य मिळूनही आपल्याला हवा तसा लाभ न मिळाल्यामुळं आणि आंतरराष्ट्रीय नाणे निधीच्या नियमांचं अगदी काटेकोर पालन करूनही फारसा परतावा न मिळाल्यामुळं मुगाबे यांचे आधारस्तंभ अस्वस्थ झालेले होते. (गौरवर्णीयांच्या मालमत्तेचा व विशेषाधिकारांचा मान राखणं, ही नाणेनिधीची एक अट होती). कायद्याची बतावणी करून जमीन सुधारणा केल्या जात असल्या तरी त्याचं रूपांतर लगेचच सक्तीनं ताबा घेण्याच्या प्रक्रियेमध्ये झालं, त्यामुळं भांडवल मोठ्या प्रमाणात देशाबाहेर गेलं आणि आणखी एक गंभीर आर्थिक संकट उभं राहिलं. या वेळी नाणेनिधीनंही आपलं कडू औषध पाजायला नकार दिला. तसंही झिम्बाब्वेला आता हे उपचार पेलले नसते.

त्यामुळं पाश्चात्त्यांनी झिम्बाब्वेत हस्तक्षेप करण्यासाठी मोर्गन त्सवांगिराई यांच्या नेतृत्वाखालील 'मूव्हमेन्ट फॉर डेमॉक्रटिक चेंज' (एमडीसी) या पक्षाचा अधिक थेट मार्ग स्वीकारला. मोठ्या प्रमाणात

**(पान ५० वर)**

आयोगाच्या शिफारशींनी सातत्याने वाढलेले पगार आहेत. खाजगी क्षेत्रात उच्चपदस्थ अधिकाऱ्यांची वार्षिक पॅकेजेस ऐकली तर सामान्य माणसाला विश्वास वाटणार नाही. या वर्गाला खूप पैसे मिळाले व मिळत आहेत हा मुद्दा नाहीये. तर या वर्गाकडे इतका पैसा येत गेल्यामुळे त्यांची बँकांच्या कर्जाची गरज कमी कमी होत गेली आहे हा मुद्दा आहे.

**नॉन बँकिंग संस्थाची आगेकूच**

देशातील बचती वाढल्या, बाहेरून भांडवल येऊ लागले आणि आरबीआयसारख्या नियामक मंडळांनी नियम शिथिल केल्यामुळे विविध नॉन बँकिंग वित्त संस्था स्थापन झाल्या आहेत. त्यात गृह कर्जे देणाऱ्या आहेत, गृहपयोगी वस्तू, चारचाकी व दुचाकी वाहने देणाऱ्या आहेत, सोने घाण ठेवून कर्जे देणाऱ्या आहेत. अनेक उत्पादक कंपन्यांनी आपल्या मालाची विक्री वाढवण्यासाठी वित्त कंपन्या स्थापन केल्या आहेत. उदा. बजाज फायनान्स, एल अँड टी फायनान्स इत्यादी.

थोडक्यात बँकिंग प्रणालीला दोन्ही कडून मार पडत आहे. एका बाजूला परंपरागत गिऱ्हाईकांकडून कर्जाचा पूर्वी सारखा उठाव नाही, दुसरीकडे जागतिक व देशपातळीवर दुसरे तगडे स्पर्धक तयार झाले आहेत तर तिसऱ्या बाजूला बचतीचा ओघ चहुबाजूंनी येत आहे. उदा. २०१४च्या अखेरीस भारतीय बँकिंग प्रणालीकडे ८२ लाख कोटींच्या ठेवी होत्या. त्यात सरासरी ८ लाख कोटींची दरवर्षी भर पडत आहे. २०१७ मध्ये या ठेवींचा आकडा ११० लाख कोटींवर पोचला आहे.

सहाजिकच बँकिंग प्रणाली व इतर कर्ज देणाऱ्या संस्था नवीन कर्जदार समूहाच्या शोधात आहेत. इथे बँकिंग प्रणालीला केंद्रस्थानी ठेऊन विश्लेषण केलेले असले तरी अतिरिक्त भांडवलाचे नक्की काय करायचे हा प्रश्न फक्त बँकिंग प्रणालीचा राहिलेला नाही तर कर्ज देण्याच्या उद्योगात असणाऱ्या सर्वच वित्तीय संस्थांचा बनत आहे. नजीकच्या भविष्यात बनणार आहे. त्या सर्व कर्ज देणाऱ्या संस्थांचे लक्ष देशातील कोट्यवधी गरीब व्यक्ती व कुटुंबांकडे गेले आहे.

●

---

**(शेवटचा आफ्रिकी मुक्तिदाता... पान १६ वरून)**

निधीपुरवठा होणारा आणि प्रसारमाध्यमांशीही अतिशय जवळीक असणारा हा पक्ष मुगाबे यांच्या कठोर व निष्ठूर आक्रमकतेसमोर मात्र टिकू शकला नाही. मुगाबे यांच्या या आक्रमकतेची अंमलबजावणी करण्याचं मुख्य काम मंगाग्वा यांनीच केलं होतं. २००८ सालच्या अतिशय कटुतेनं झालेल्या निवडणुकांमध्ये मंगाग्वा यांच्या राजकीय व्यक्तिमत्वाची दयाशील व सौम्य बाजू समोर आली. मुगाबे व त्सवांगिराई यांच्यात सत्तावाटपासंबंधीच्या वाटाघाटी करण्यात मंगाग्वा यांनी कळीची भूमिका निभावली. हा एक अल्पजीवी दिलासा ठरला. सलोखास्थापनेच्या प्रयत्नांसंदर्भात मुगाबे यांच्याविषयी पाश्चात्त्य राष्ट्रांच्या मनात काहीशी सकारात्मक भावना निर्माण झाली.

आफ्रिकी मुक्तिदात्यांच्या नामावलीतील शेवटचं नाव इतिहासजमा होत आहे, अशा वेळी त्यांच्या गच्छंतीनं देशात अत्यानंदाचं वातावरण असलं तरी खोलवर दुभंगलेल्या रचनेवरचा हा केवळ तात्कालिक उपाय आहे. त्यांच्यानंतर पदावर आलेल्या नेतृत्वाची कारकीर्द बघता देशातील मूलभूत समस्यांवर उपाय करण्याची इच्छाशक्ती वा क्षमता या नेतृत्वाकडंही असलेली दिसत नाही. पण जनतेमध्ये जाग्या झालेल्या आशेच्या दबावामुळं मंगाग्वा असाधारण प्रयत्न करून काही गोष्टी साध्य करतीलही कदाचित.

●

**अनु. : प्रतिनिधी**

इकॉनॉमिक अँड पोलिटिकल वीकलीचे विविध संपादकीय लेख अनुवादित करण्यासाठी 'एच. टी. पारेख फाउंडेशन'चे साहाय्य लाभले आहे.
(२५ नोव्हेंबर, २ व ९ डिसेंबर या अंकातून)